# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** उस्मानाबाद शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0213 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/06/2023 19:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 19/06/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/06/2023
   **Time From (वेळेपासून):** 12:55 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/06/2023 **Time (वेळ):** 19:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 032

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/06/2023 19:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.05 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे,उस्मानाबाद शहर ,उस्मानाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** -अक्षय राजकुमार घाडगे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं:, ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिवाजी महाराज चौक, बेंबळी, ,ताजिउस्मानाबाद,उस्मानाबाद,उस्मानाबाद शहर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिवाजी महाराज चौक, बेंबळी, ,ताजिउस्मानाबाद,उस्मानाबाद,उस्मानाबाद शहर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9130767801

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव वसंतराव शिंदे | | | 1. नेमणुक पोलीस ठाणे, उस्मानाबाद , उस्मानाबाद , उस्मानाबाद शहर,उस्मानाबाद, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 12,000 रुपये ज्यात 500रुपये दराच्या 24चलणी नोटा असे एकुण | 12,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी अक्षय राजकुमार घाडगे, वय 25 वर्ष, व्यवसाय- चालक, रा.शिवाजी महाराज चौक, बेंबळी, ता.जि.उस्मानाबाद. मो.नंबर 9130767801मी दिनांक 19.06.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे पोलीस निरीक्षक, श्री राठोड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद यांचे समक्ष हजर राहुन माझी तक्रार दिली होती. त्यातील थोडक्यात हकीकत अशी की, मला स्वत:ला गायछाप व गुटख्याचा व्यवसाय सुरु करावयाचे असल्याने व पोलीस शिंदे साहेब यांची चांगली ओळख असल्याने मी दिनांक 07.06.2023 रोजी पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे जावुन शिंदे साहेब यांची भेट घेतली. तेव्हा मी त्यांना मी गायछाप व गुटख्याचा व्यवसाय चालु करणार आहे, सहकार्य असु दया असे म्हणालो. तेव्हा त्यांनी आपली जुनी ओळख आहे, माझे सहकार्य तर राहील पण शेख साहेबाकडे पण लक्ष दयाव लागेल असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना शेख साहेबांच काय असे विचारले असता त्यांनी मला गायछाप व गुटख्याचा व्यवसाय चालु करायचा असेल व कोणतीही कारवाई करु दयायची नसेल तर महिन्याला 15000/- रुपये हप्ता दयावा लागेल असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना मी नव्याने व्यवसाय सुरु करीत आहे, मी पैसे देवू शकत नाही असे म्हणालो. तेव्हा त्यांनी आमचे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गायछाप व गुटख्याचा व्यवसाय चालु करायचा असेल तर तुला महिन्याला हप्ता दयावाच लागेल, तरच तुझा व्यवसाय चालु देवू असे म्हणाले. वगैरे सविस्तर तक्रार दिली होती. वरील प्रमाणे तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राठोड यांनी माझी व पोलीस उपअधीक्षक, म्हेत्रे साहेब, तसेच दोन शासकीय पंच श्री.रमेश लाकाळ, कनिष्ठ सहायक लिपिक व श्री अप्पुराज जाधव, कनिष्ठ सहायक (लेखा) दोघे शिक्षण विभाग (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांची तसेच त्यांचे सोबत असलेले स्टाफमधील कर्मचारी पोहेकॉ/ जाधव, पोना/पाटील, पोशि/डोके यांचेशी आपसी परिचय करुन दिला. तसेच पोनि राठोड यांनी पंच क्रमांक 1 म्हणुन रमेश लाकाळ व पंच क्रमांक 2 म्हणुन अप्पुराज जाधव यांची निवड केली. त्यानंतर राठोड साहेब यांनी मला माझी तोंडी तक्रार सांगण्यास सांगितली असता मी माझी तोंडी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली व ती संगणकावर टंकलिखित केली. संगणकावर टंकलिखित केलेली माझी तक्रार मी पुन्हा वाचुन बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर मी व राठोड साहेब यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर सदरची तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली. मी सांगितलेली तोंडी व संगणकावर टंकलिखित केलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार पोनि राठोड साहेब यांनी स्वत:कडे ठेवुन घेतली.त्यानंतर सापळा कारवाईकामी लागणारे सर्व साहित्यासह पोलीस उपअधीक्षक म्हेत्रे साहेब, पोनि राठोड साहेब, त्यांचा स्टाफ, पंच असे त्यांचेकडील खाजगी कार क्रमांक एम.एच.03 डी 7317 ने व मी माझेकडील मोटार सायकलने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथुन रवाना होवुन बार्शी नाक्याचे पुढे उस्मानाबाद बार्शी रोडवर रिकामे मैदानात सुरक्षित ठिकाणी गेलोत. सदर ठिकाणी पोनि राठोड साहेब यांनी मला दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, माझ्याकडे माझे तक्रारीमधील नमुद कामासाठी पोलीस शिंदे साहेब हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत आज दिनांक 19.06.2023 रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.
त्यानंतर राठोड साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी त्यांचेकडील एका काळ्या रंगाच्या बॅग मधुन Sony कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर üü बाहेर काढुन त्यामध्ये 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णन नमूद असलेले मेमरी कार्ड टाकले व राठोड साहेब यांनी कळविले की, लाचमागणी



Scanned with CamScanner

पडताळणी दरम्यान तक्रारदार व पोलीस शिंदे साहेब यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार आहे. पोहेकॉ/जाधव यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसले बाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून देण्यात आली. त्यानंतर मला पोलीस शिंदे हे कोठे भेटतील याबाबत विचारले असता मी त्यांना पोलीस शिंदे साहेब हे पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे भेटतील असे सांगितले. त्यावरुन पोनि राठोड साहेब यांनी मला सुचना केली की, मी पंच क्रमांक 1 रमेश लाकाळ यांना सोबत घेवुन पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे जावुन त्यांची भेट घ्यावी. त्यांना स्वत:चे कामाबाबत बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे असे सांगितले. तसेच दोन्ही पंचांना देखील सुचना दिल्या. त्यानंतर राठोड साहेब यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे छातीच्या डावे बाजुस आतमध्ये बनियनला पिनने लावुन ठेवुन दिले. त्यानंतर मला व पंच क्रमांक 1 यांना माझेकडील मोटार सायकल क्रमांक एम.एच.25 ए. पी.1610 ने रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे गेलो. तेव्हा शिंदे साहेब हे पोलीस स्टेशनचे बाहेर उभा असलेले दिसले. तेव्हा मी व पंच असे त्यांचे जवळ जावुन त्यांनी भेट घेतली. तेव्हा पोलीस शिंदे साहेब हे तु गेलास की तिकडच जातो..बोल काय ठरलं तुझं.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना पुण्याला गेलो होतो..काय कमी व्हायचं नाही का? असे म्हणालो असता त्यांनी सांगितलयं की तुला दोघाचं.. तु सांग ..असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना दहा असे म्हणालो असता त्यांनी लई कमी होतेत..असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना दुसऱ्याकडुन दहा घ्यायलाव... आपलाच माणुस हाय असे म्हणालो.. तेव्हा त्यांनी कमी होतेत.. पंधरा तरी दे .. सगळे तिकडचं दयाव लागतय.. मला काय राहील असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना बघा शेख साहेबाला बोलुन.. बारीक हाय म्हणावं.. पुढच्या वेळी पुढ वाढवुन असे म्हणालो. तेव्हा त्यांनी सगळे त्यांनाच दयाव लागतयं.. मला काय राहील असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना फिक्स सांगा आता शेवट.. तसं हिशोबानी असे म्हणालो असता त्यांना बारा कर असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना उदया चालु करायचयं, संध्याकाळी घेवुन येतो अश्या आशयाचे आमचेत बोलणे झाल्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. त्यानंतर पोहेकॉ/जाधव यांनी माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर काढुन राठोड साहेब यांचे ताब्यात दिले. त्यांनी ते घेवुन बंद केले व मला बाजुला थांबण्यास सांगितले. लगेच थोडया वेळात मला जवळ बोलावुन हकीगत विचारली असता मी वरील प्रमाणे हकीगत पंच क्रमांक 02 यांचे समक्ष सांगितली. पोलीस शिंदे साहेब यांनी पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर हद्दीमध्ये मला गायछाप व गुटख्याचा व्यवसाय चालु करु देण्यासाठी व त्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी माझेकडे 15000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 12000/- रुपये लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर पोनि राठोड साहेब यांनी सांगितले की, सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यांचे सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम, चिजवस्तु त्यांचेकडील खाजगी कारचे पाठीमागील शिटवर काढुन ठेवल्या. त्यानंतर मी काढुन ठेवलेल्या चिजवस्तु व्यतिरिक्त इतर काही माझेकडे नसल्याची खात्री करुन मी हजर केलेले 12000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 24 चलनी नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावणे, ॲन्थ्रासीन पावडरचे उपयोग, अल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग व गुणधर्म , त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन तसेच लाचेच्या नोटांची अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याखाली तपासणी वगैरे कार्यवाही केल्यानंतर पोशि/डोके यांनी लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिल्या व उर्वरीत वस्तु परत केल्या असता त्या मी माझे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये, मोबाईल शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिला. त्यानंतर लाच स्विकृतीनंतर डावा हात केसावरुन फिरविणे बाबत ईशारा मला नेमुण दिला.त्यानंतर पोलीस निरीक्षक राठोड यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोनि राठोड साहेब यांच्या सांगण्यावरुन पोहेकॉ/जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णन नमुद असलेले मेमरीकार्ड टाकले. सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पिनने माझे शर्टचे आत बनियनला पिनने लावुन पंच क्रमांक 1 यांचेसह मला माझेकडील मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे माझेकडील मोटार सायकलने पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे जावुन पोलीस शिंदे साहेब यांची भेट घेतली. तेव्हा त्यांनी मला त्यांचेकडील मोटार सायकलवर बसणे बाबत ईशारा केला. तेव्हा मी मोटार सायकलवर बसुन त्यांचेसोबत कंदी चहाचे दुकानावर गेलो. तेव्हा मी त्यांना भावाला बोललोय 12000/- ठरलयं म्हणुन, विमल बी भेटना रिजवानकडं.. तुम्ही सांगचाल का त्याला असे म्हणालो. तेव्हा त्यांनी बिलकुल.. काय सांगु असे म्हणुन त्याला फोन लावुन कल एक लडका आयेगा.. डेली चालु करणेवाला है.. तुम्हारे पास से माल लेनेवाला है.. क्या लगता है दे दो उनको असे सांगितले. तसेच एल.सी.बी.चं तुझ्या तु बघुन घे असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना बघु का असे म्हणालो.. त्यानंतर मी त्यांना दहा हजार ऐवढे सिटीत म्हटल्यावर अवघड हाय..दहा अन बारा.. असे म्हणालो. तेव्हा ते एक सांगु का तुला.. होत आसल तर कर.. नाहीतर नाही..पोलीस स्टेशन पुर्तच सांगतोय... ट्राफीकची



Scanned with CamScanner

मंथली, डीवायएसपीची मंथली, एल.सी.बी.ची मंथली ती जिम्मेदारी मी घेणार नाही.. फक्त आमच्या ठाण्याची घेणार असे म्हणाले.. त्यानंतर आम्ही पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे आलोत. तेव्हा शिंदे साहेब यांनी मला सगळ्यात महत्वाच आम्ही तर कोणी पकडत नाही.. पकडल तर मी साहेबाला सांगितल तर सोडतेत..असे म्हणाले. त्यानंतर आमचेत व्यवसायाचे अनुषंगाने बोलणे झाल्यानंतर आम्ही परत पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर येथे परत आलोत. परत आल्यानंतर शिंदे साहेब यांनी पैसे देणेबाबत ईशारा केला. तेव्हा मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन उजव्या हाताने नोटांची घडी काढुन शिंदे साहेब यांचे समोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने घेवुन त्यांचे जीन्स पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिले. तेव्हा मी मला नेमुन दिलेला ईशारा केला. ती वेळ साधारणत: 12.55 वा.ची होती. मी ईशारा केल्यानंतर लागलीच पोलीस उपअधीक्षक म्हेत्रे साहेब, पोनि राठोड साहेब तसेच पंच क्रमांक 2 व सापळा पथक सदर ठिकाणी हजर आले. तेव्हा मी थोडा बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर थोडयावेळाने पोनि राठोड यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/जाधव यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद करुन राठोड साहेब यांचेकडे दिले. तेव्हा राठोड साहेब यांनी सर्वांसमक्ष पोलीस शिंदे साहेब यांना त्यांचे नावाबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव महादेव वसंतराव शिंदे, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पोहेकॉ/992, नेमणुक पोलीस ठाणे, उस्मानाबाद शहर, रा.हिरो शोरुमच्या पाठीमागे, स्वामी विवेकानंद कॉलनी, उस्मानाबाद असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि राठोड यांनी मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यावरुन मी बाजुला जावुन थांबलो. त्यानंतर मला लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे येणेबाबत सांगितले. त्यावरुन मी सदर ठिकाणी हजर आलो. थोडयावेळानंतर राठोड साहेब व त्यांचा स्टाफ लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, उस्मानाबाद येथे आले. त्यानंतर काहीवेळाने पोनि राठोड यांनी मला त्यांचे रुममध्ये बोलावुन रुमच्या खिडक्या, दरवाजा,व लाईट बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व कपडयांची तपासणी केली तेंव्हा माझे उजवे हाताचे बोटाचे पे-यावर तसेच माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशाचे तोंडास व आतील बाजुस ठिकठिकाणी अंथ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोनि राठोड यांचे सुचनेवरुन मी माझेकडील सर्व चिजवस्तु काढुन दाखविल्या. तसेच राठोड साहेब यांनी दोन्ही पंचा समक्ष हकीगत विचारली तेंव्हा मी वरील प्रमाणे हकीगत सांगितली. त्यानंतर पोनि राठोड यांनी माझे व दोन्ही पंचासमक्ष रेकॉर्डर मधील संभाषण एकले.

एकंदरीत मी दिनांक 19.06.2023 रोजी दिलेल्यां तक्रारीवरुन पोलीस शिंदे साहेब, पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर यांनी पोलीस ठाणे उस्मानाबाद शहर हद्दीमध्ये मला गायछाप व गुठख्याचा व्यवसाय चालु करु देण्यासाठी व त्यावर कोणतीही कारवाई न करण्यासाठी माझेकडे 15000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 12000/- रुपये लागलीच स्विकारण्याचे मान्य केले. सदर 12000/- रुपये रक्कम लागलीच पंच साक्षिदारासमक्ष पोलीस शिंदे साहेब यांनी स्विकारली असता त्यांना पोलीस निरीक्षक, विकास राठोड यांनी लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे. म्हणुन माझी महादेव वसंतराव शिंदे, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पोहेकॉ/992, नेमणुक पोलीस ठाणे, उस्मानाबाद शहर, रा.हिरो शोरुमच्या पाठीमागे, स्वामी विवेकानंद कॉलनी, उस्मानाबाद यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मी माझी फिर्याद देत आहे. हिच माझी फिर्याद असुन सदरची फिर्याद मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

USMAN CHAND SHAIKH(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. उस्मानाबाद (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): USMAN CHAND SHA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner